दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता




vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.१८ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २५५ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 18 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 255 | Pages 4 | Rate 4 Rs

# महिन्याभरात पेट्रोल १२० ते १३० रुपयांवर जाणार : जयंत पाटील यांनी वर्तवले भाकित

## जुन्या ट्विटवरून मुख्यमंत्र्यांना लगावला खोचक टोला

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना जुन्या ट्विटची आठवण

जयंत पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्र सरकारमधील विसंगतीवर बोट ठेवले. पंधरा दिवसांपूर्वी देशाच्या गृहमंत्र्यांनी सांगितले होते की आपल्याकडे ६ महिने पुरेल इतका इंधन साठा आहे. त्याला महिनाही झाला नाही, तोच पंतप्रधानांनी नागरिकांना खर्च कमी करण्याचे आवाहन केले. २०१३ मध्ये जेव्हा आर्थिक परिस्थिती बिकट झाली होती, तेव्हा तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी अशीच भूमिका घेतली होती. त्यावेळी आत्ताच्या मुख्यमंत्र्यांनी देशाची आर्थिक व्यवस्था डबघाईला आल्याचे ट्विट केले होते. मात्र, आज तेच मुख्यमंत्री 'पंतप्रधानांच्या आवाहनाची थट्टा करू नका' असे ट्विट करत आहेत, असा टोला जयंत पाटलांनी लगावला.

दैनिक वादळ वार्ता
**सांगली (वृत्तसंस्था)**

देशात इंधन दरवाढीचा भडका उडाला असून पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत थेट ३ रुपयांची वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे माजी अर्थमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी देशाच्या आणि राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर अत्यंत गंभीर भाष्य केले आहे. आज ९६ रुपयांना मिळणारा डॉलर महिन्याभरात १०० रुपयांवर जाईल, तर पेट्रोलचे दर १२० ते १३० रुपयांवर पोहोचतील, असा इशारा त्यांनी दिला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच देशातील जनतेला इंधन बचतीचे आवाहन केले होते. या आवाहनाच्या दोन दिवसांतच पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढून, प्रत्येकी ३ रुपयांनी महाग झाले आहेत. या महागाईवरून विरोधकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर जयंत पाटील यांनी पेट्रोल-डिझेलची आणखी भाववाढ होणार असल्याची भविष्यवाणी केली. शेतकरी नेते रघुनाथदादा पाटील यांच्या अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन




सोहळ्यात बोलताना जयंत पाटील यांनी केंद्र सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार तोफ डागली.देशातील सद्यस्थितीवर चिंता व्यक्त करताना जयंत पाटील म्हणाले, कोरोनाच्या काळात सरकारने लॉकडाऊन लावला होता. पण आता देशापुढील आर्थिक संकट पाहता, परिस्थिती अशी निर्माण होईल की देशात आपोआपच लॉकडाऊन लागेल. जेव्हा देशावर आर्थिक संकट येते, तेव्हा त्याचा पहिला फटका शेतकरी आणि शेतमजुरांना बसतो, त्यामुळे या संकटातून मार्ग कसा काढायचा यावर गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



### ...तर सर्व मंत्रिमंडळ दुचाकीवर येईल!

जयंत पाटील म्हणाले की, आर्थिक काटकसरीचा भाग म्हणून पंतप्रधानांनी आपला ताफा कमी करत दोन गाड्यांवर आणला आहे, तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री दुचाकीवरून फिरायला लागलेत. आता याचेच अनुकरण राज्यातील इतर मंत्रीही करतील आणि संपूर्ण मंत्रिमंडळ दुचाकीवर येईल, अशी अपेक्षा करूया!

### वाशिममध्ये ड्रम घेऊन हाणामारी; पेट्रोल पंपांवर रांगा

पंतप्रधानांनी देशवासीयांना पेट्रोल-डिझेल आणि सोन्याची खरेदी कमी करण्याचे आवाहन केल्यानंतर अवघ्या दोन दिवसांतच दर वाढल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. जयंत पाटील यांनी सांगितले की, इंधन टंचाईच्या भीतीने लोक पेट्रोल पंपांवर रांगा लावत आहेत. वाशिममधील एका पेट्रोल पंपावर तर नागरिक चक्क ड्रम घेऊन डिझेल-पेट्रोलसाठी एकमेकांशी भिडले असून तिथे मारामारी सुरू असल्याचा व्हिडिओ मी स्वतः पाहिला आहे.

# माजलगावचे भूमिपुत्र प्रसिद्ध कवी डॉ.काळे यांना राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

कर्नाटकातील बेळगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या ९८ व्या राष्ट्रीय साहित्य व कवी संमेलन २०२६ तसेच राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्यात माजलगावचे भूमिपुत्र, प्रसिद्ध कवी, साहित्यिक डॉ. प्रवीण काळे संगमकर यांना राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. साहित्य, सामाजिक जागृती आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हे भव्य साहित्य संमेलन इंडियन पोलिस मित्र भारत, विशेष कार्यकारी अधिकारी न्याय हक्क जनजागृती फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. संविधान, साहित्य आणि सामाजिक एकात्मता ही या संमेलनाची प्रमुख थीम होती. सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत विविध साहित्यिक कार्यक्रम, कवी संमेलन, संवाद परिषद आणि पुरस्कार



वितरण सोहळा उत्साहात पार पडला.
या संमेलनाचे अध्यक्षस्थान सीए डॉ. शंकर घनश्यामदास अंदाज यांनी भूषविले. कार्यक्रमाचे उद्घाटन शिवलीनभू उगार यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून वाळासाहेब उदयद्री, ऊइझ श्री नारायण भारमणी, श्री अनिल वनके, वैशाली सुतार आणि अनिता काळे उपस्थित होते.कार्यक्रमात साहित्य आणि संवाद परिषद या विशेष सत्रात कमलाकर रा. बेंटेकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच प्रतिमा पूजनाचा मान कवी सरकार विलास पाटील यांनी पार पाडला. स्वागताध्यक्ष म्हणून श्री सुभाष कुमार व प्रवीण वेडकीके यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी साहित्यिका कवयित्री डॉ. मंजू राजे जाधव या होत्या तर परिसंवादाचे प्रमुख वक्ते अशोक मोहिते सर प्रसिद्ध साहित्यक हे होते.डॉ. प्रवीण काळे हे आपल्या प्रभावी लेखनशैलीमुळे, सामाजिक आशय असलेल्या कवितांमुळे आणि युवकांमध्ये साहित्याची आवड निर्माण करण्यासाठी विशेष ओळखले जातात. याआधीही त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले असून राष्ट्रीय स्तरावर मिळालेला हा सन्मान त्यांच्या कार्याला मिळालेली मोठी पावती मानली जात आहे.माजलगावसह संपूर्ण बीड जिल्ह्यासाठी ही अत्यंत अभिमानाची बाब असून विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून डॉ. प्रवीण काळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सेट जोसेफ स्कूलमधील समस्यांकडे शासनाने लक्ष देण्याची पालकांची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

कुलाबा येथील सेट जोसेफ, स्कुल या शाळेतील विविध समस्यांबाबत पालकांनी नाराजी व्यक्त केली असून शिक्षण विभागाने तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली येणाऱ्या या शाळेत अनेक मूलभूत सुविधा व शैक्षणिक उपक्रमांमध्ये कमतरता असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.

पालकांच्या माहितीनुसार, शाळेत विविध शालेय उपक्रम नियमितपणे राबविले जात नसून शिक्षण, क्रीडा, स्वच्छता आणि व्यवस्थापन या स्तरांवर दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. शाळेच्या इमारतीतील छत गळती, खेळाच्या मैदानाची अपुरी व्यवस्था तसेच विद्यार्थ्यांच्या निकालात सातत्याने होत असलेली घसरण यामुळे पालक चिंतेत आहेत.

सन १९२९ मध्ये स्थापन झालेल्या या शाळेने पूर्वी शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात चांगली प्रतिष्ठा मिळवली होती. मात्र गेल्या काही वर्षांत व्यवस्थापनातील कमकुवतपणामुळे शाळेची प्रतिमा मलिन होत असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली आहे.विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण



शिक्षणासाठी आवश्यक सुविधा, सक्षम शिक्षक व्यवस्था आणि शिस्तबद्ध प्रशासन याकडे शिक्षण विभागाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी पालकांकडून करण्यात येत आहे.

# ऐतिहासिक होट्टलच्या सिद्धेश्वर मंदिरात मध्यरात्री दरोडा लाखो रुपयांची रोकड लंपास

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील ऐतिहासिक आणि जगप्रसिद्ध हेमाडपंती श्री सिद्धेश्वर मंदिरावर अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री दरोडा टाकल्याची धक्कादायक घटना घडली आहे. चोरट्यांनी मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराचे कुलूप तोडून थेट दानपेटीच पळवून नेली. या दानपेटीतून अंदाजे १ लाख रुपयांपेक्षा जास्त रोकड लांबवल्याचा संशय आहे. या घटनेमुळे संपूर्ण नांदेड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून भाविकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. सिद्धेश्वर मंदिरात वर्षानुवर्षांच्या परंपरेनुसार दररोज पहाटे ५ वाजता काकड आरती होते. नेहमीप्रमाणे शनिवारी पहाटे पुजारी आणि ग्रामस्थ मंदिरात आले. मात्र, मंदिराच्या दाराचे तुटलेले कुलूप पाहून त्यांचे पाय थरथरले. आत प्रवेश करताच मंदिराची मुख्य दानपेटी गायब असल्याचे दिसले आणि चोरीचा हा थरार उघडकीस आला.

चोरी केल्यानंतर चोरट्यांनी मंदिरापासून काही अंतरावर असलेल्या गंगाधर दासरवाड यांच्या शेताचा आसरा घेतला. तिथे त्यांनी लोखंडी दानपेटी फोडली. वर्षभरापासून भाविकांनी अर्पण केलेल्या नोटांवर चोरट्यांनी डल्ला मारला. मात्र, पळून जाण्याच्या घाईत किंवा वजनामुळे चोरट्यांनी २७ हजार रुपयांची चिल्लर (नाणी) शेतातच सोडून दिली. सकाळी पोलिसांनी पंचांसमक्ष या चिल्लरची मोजदाद केली.

घटनेची माहिती मिळताच मंदिर समितीचे अध्यक्ष तथा तहसीलदार भरतराव सूर्यवंशी आणि मरखेल पोलिसांनी धाव घेतली. प्रकरणाचे गांभीर्य पाहून नांदेडवरून थेट श्वान पथक, फिंगर प्रिंट एक्सपर्ट्स आणि स्थानिक गुन्हे शाखेचे ( एल सी बी) पथक घटनास्थळी दाखल झाले. उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी स्वतः तपासावर लक्ष ठेवून आहेत. सध्या पोलीस निरीक्षक हुडेकर यांच्याकडे तपासाची धुरा आहे.



### पोलीस म्हणतात मुसक्या आवळणारच..

आम्ही रेकॉर्डवरील मंदिर चोरांची यादी काढली असून स्थानिक भुरट्या चोरांवरही आमची करडी नजर आहे. एलसीबी आणि स्थानिक पोलीस एकत्र काम करत असून, खूप लवकरच या चोरट्यांच्या मुसक्या आवळून त्यांना जेरबंद करू..

मिलिंद सोनकांबळे
(प्रमुख, एलसीबी, नांदेड)

# संपादकीय


## साधी, सुंदर माणसे

रशोल. कशोलच्या पुढले गाव. कशोल. मणीकरणच्या पुढले गाव आणि मणीकरण? मणीकरण आहे हिमाचलमधले शिखांचा गुरुद्वारा असलेले, पार्वती नदीकाठचे एक सुंदरसे गाव. पार्वती नदीत उष्ण पाण्याचे झरे आणि त्यामुळे गावभर थंडगार नदीच्या पाण्यावर उष्ण झऱ्यांच्या वाफेचे ढग पसरलेले. चंद्रखणीच्या ट्रेक रूटवरील ही डोंगरातली सुंदरशी गावे एव्हाना बऱ्याच जणांच्या माहितीची असतीलही. या स्तंभाच अजून एकदाही मी हिमालय ाविषयी लिहिले नाही म्हणताना मलाच आश्चर्य वाटले. पण खरे तर मुद्दामही मी हिमालयाच्या दिशेने गेले नाही; नाहीतर हिमालयाच्या प्रेमाने माझे तिथेच रेंगाळून जाणे होईल! आता जरा काही व्यक्तींविषयी लिहावे असा विचार केला. नेहमीप्रमाणेच लेखाचे शीर्षक आधी आले – 'साधी, सुंदर माणसे!' नाव लिहिले आणि वळून पाहिले तर का कोण जाणे पण हिमालयातली माणसे हिमालय उतरून माझ्या दिशेने येताना दिसली.तर ट्रेक चंद्रखणीचा. रशोलहून मलाना गावाच्या दिशेने प्रवास सुरू झाला. आदल्या रात्री तुफान पावसाने सारेच निसरडे झालेले आणि गावातल्या लोकांनीही आदल्या संध्याकाळी तसा त्रासच दिलेला. त्यामुळे काहीशा झाकोळलेल्या मन:स्थितीत मुक्काम हलवला. आता पुढचा टप्पा मलानाचा आणि मलानाविषयी तर ऐकून होतो की तिथल्या माणसांना बाहेरचे लोक गावात आलेले आवडत नाहीत. त्यामुळे गावात थांबूच नका वगैरे वगैरे. तेव्हाचे वय तरुण. जगाचा अनुभव नाही; पण हिम्मत खूप.रशोल ओलांडले. महिना सप्टेंबरचा. भाद्रपदाचा. पायवाट असंख्य रंगीत फुलांनी भरून गेलेली. आदल्या संध्याकाळ–रात्रीचा झाकोळ दूर झाला. हिमालयाची थंड हवाच अशी की मनावरचा ताण निघून जातो. पाठीवरच्या सॅकसोबतचे चालणे एखादे गाणे रुजावे तसे रुजू लागलेले, आणि एवढ्यात खरोखरच गाण्याची एक सुरेल उंच लकेर कानावर आली. पहाडी मनमोकळ्या गाण्याच्या सुरांची लड. गाण्याच्या सुरांचा वेध घेत पाय आपोआप मंदावले तर गवतफुलांनी भरलेल्या उंच गवतातून एखाद्या इंद्रधनुष्याप्रमाणे ती उगवली. जणू रानवल्लरी. तिच्या भावासोबत. पंधरा, सोळा–सतरा वर्षे वयाची मुलगी. सुडौल आकर्षक बांधा. अर्थातच गोरा झळझळीत हिमालयीन रंग. तरतरीत नाक. गालावर गुलाबी छटा. डोळ्यात साक्षात निसर्गचमक. केसांवर रेशमी रुमाल बांधलेला. अंगात रंगीत घागरा–पोलका. तिच्यासोबत तिचा लहान भाऊ. तोही असाच दहा–बारा वर्षांचा, घोळदार विजार, कुर्ता, गोल टोपी. इवल्या चणीचा. मात्र त्या दोघांनी आमच्याकडे ढुंकूनही पाहिले नाही. पुन्हा एकवार गाण्याची लकेर घेत ती मुलगी आली तशीच आमच्या अंगावरून निघून गेली. एखाद्या पाखराची सुरेल तान इतके नैसर्गिक तिचे गाणे! हिमालयाचे गाणे होऊन व सौंदर्याचे माप होऊनच ती सोबत करत माझ्यात राहिली आहे.पिंढारी ग्लेशियरचा ट्रेक. वाटेत खाती नावाचे गाव लागले. या गावात आमचा मुक्काम एखाद दिवस होऊन मग पुढे फुरकिया, झिरो पॉईंट असे जायचे होते. आम्ही पाच–सात जण निघालो होतो. खाती गावात पोचलो तर वाटेत एक प्रौढ वयाची बाई भेटली. घट्ट–मुट्ट अंग. तोच हिमालयाचा गोरा रंग, पण आता काहीसा उतरलेला. आयुष्यभर कष्ट–मेहनत केल्याच्या सगळ्या खुणा तिच्या देहावर. चेहरा काहीसा राकट, पण तरीही सौम्य भाव. अंगावर साधे हिमालयीन गरम कपडे. मळकट रंगाचे. काय बोलणे चालू झाले, आत्ता आठवत नाही, पण मध्येच सोबत असलेल्या मित्राने आमच्याकडे बोट दाखवत चेष्टेत म्हटले की या चार–चार जणी माझ्या बहिणी आहेत. यांची अजून लग्न होत नाहीत म्हणून माझे लग्न रखडले आहे. तिने अविश्वासाने आमच्याकडे पाहिले. त्यांचे दोघांचे बोलणे हसण्यावारी नेत आम्ही आमच्या मुक्कामी हसत–खिदळत पोहोचलो. दुपार ओलांडली. तोवर ती बाई पुन्हा आमच्या टेन्टबाहेर उगवली. वाटले पैसे मागायला आली असेल. 'काय पाहिजे?', विचारले तर ती सांगेना आणि तिच्या सोबत एक तरुण लाजरा–बुजरा मुलगा. तो तिच्याआड दडलेला. बाई त्याला काहीतरी सांगत होती. पुढे ढकलत होती. काय प्रकार आहे, काही कळेना.तरुण पोरगा मध्यम बांध्याचा. गोरा, नाकेला. अंगात खास कपडे घालून आलेला. आईच्याच चेहरेपट्टीचा पण चेहऱ्यावर बुजलेले भाव. ती मात्र आता धिटाईने आलेली. थोड्याच वेळात उलगडा झाला की आमच्या चौघींच्या रखडलेल्या लग्नाचा मार्ग मोकळा व्हावा म्हणून तिने आपला लग्नाचा मुलगा आम्हा चौघींना दाखवायला आणला होता. जिला पसंत पडेल तिने माळ घालावी! अरेच्चा... म्हणूनच नवरेबुवा लाजत होते तर! आता मात्र त्या दोघांची समजूत काढता काढता सगळ्यांची तारांबळ उडाली. मुलगा आणि बाई यांच्यात इतका निर्व्याज साधेपणा की 'साधेपणाची मूर्तिमंत व्याख्याच' होऊन गेले आहेत हिमालयातल्या खाती गावचे ते दोघे माय–लेक!एक होता पोलमन. हा भेटला सिक्कीमला झोंगरीच्या वाटेवर युकसूम नावाच्या छोट्या गावात. पोर्टर म्हणून तो आमच्यासोबत झोंगरीपर्यंत येणार होता. अगदीच विशीत असेल तेव्हा तो, पण वरपर्यंत हिमालयात जाऊन जाऊन एव्हाना विशीतच पोलमनची दोन बोटे हिमदंशाने पार झडून गेलेली. पोलमनला त्याचे काहीच विशेष वाटत नव्हते. बाकी दणकट देहयष्टीचा पोलमन पोर्टर–कम–वाटाड्या–कम–कूक होऊन येणार होता. बसक्या नाकाचा आणि पसरट चेहऱ्याचा पोलमन डोक्यावर गोल कॅप घालून कुणीतरी कधीतरी दिलेले फिकट निळे जाकिट मिरवीत सदा गडबड, बडबड करत फिरत असे. हा तसा लहरी प्राणी.आमच्या आठ–दहा दिवसांच्या मुक्कामात कधी रागवायचा. सोडून जाण्याच्या धमक्या द्यायचा. पुन्हा परतायचा. शेवटच्या झोंगरीच्या मुक्कामात मात्र अती थंडीत सगळेच कोलमडले तेव्हा पोलमनने घेतलेली सगळ्यांची काळजी विसरणे शक्य नाही. आमच्याच वयाचा, पण किती कष्टप्रद जीणे. किती समर्पण. लहरी, रुसणारा पोलमन झोंगरीच्या मुक्कामात मात्र प्रत्येकाच्या हृदयाला स्पर्श करून गेला. नि:स्वार्थ प्रेम, माया, काळजी ह्या पैशांपलीकडच्या भावना. माणूसपणाच्या खुणा. रक्तापलीकडचे बंध तिथे जुळतात आणि त्यासाठी मन लागते ते निर्व्याज, साधेसुधे. आता कधी पोलमनची आठवण येते तर वाटते, इतक्या दुर्गम बर्फाच्या शिखरांवर सतत पोर्टर–वाटाड्या म्हणून काम करणारा पोलमन आता हयातही नसेल कदाचित किंवा असला तरी एव्हाना अतीवृद्धच होऊन गेला असेल. जगण्याची कुरकूर करणारे आपण , कशी तुलना करावी या पहाडी लोकांच्या कष्टांशी!पोलमन आठवला आणि रांगच लागली. आदिल आला. फारुख आला. शाहिद आला. फरहान आला. हे सारे अगदी अलीकडच्या करोनाकाळानंतर भेटलेले. काश्मीर ट्रेकचे सोबती. आमचे वाटाडे. करोनापश्चात केलेला हा काश्मीरचा रम्य ट्रेक. बेस कॅम्पवर सामान पाठीवर घेता घेताच आदिल आला. ही सारी मंडळी फक्त सोबत वाट दाखवण्यासाठी आलेली होती, पण माझी सॅक माझ्या पाठीवर चढण्याआधीच आदिलने ती आपल्या पाठीवर घेतली. आदिलसोबत गप्पा मारत प्रवास सुरु झाला. तोच हिमालयीन गोरा रंग सगळ्यांचाच, आदिल, फरहान, शाहिद आणि फारुखचाही. त्यातला फारुख बहुधा त्यांचा सीनियर असावा, कारण त्याचा रुबाब जास्त. काळा गॉगल. केसांची स्टाईल.

# माझी आजी–माझ्या आयुष्याची खरी शिल्पकार

दैनिक वादळ वार्ता

**लोहा | प्रतिनिधी**



आई बाळाला जन्म देते, पण त्या बाळाला प्रेमाने, मायेने, संस्कारांनी आणि त्यागाने मोठं करणारी व्यक्ती म्हणजे आजी.

आईच्या कुशीत जन्म मिळतो, पण आजीच्या कुशीत माणूसपण शिकायला मिळतं.

माझ्या आयुष्यातही अशीच एक देवमाया होती – माझी आजी, गिरजाबाई देवराव आप्पा चपटे.

आजच्या धावपळीच्या जगात माणसं पैशामागे धावत आहेत, नाती हरवत चालली आहेत, आणि मायेची ऊब कमी होत चालली आहे. अशा काळात आजीचं प्रेम म्हणजे देवाने दिलेला अमूल्य आशीर्वाद असतो.

आजीचं घर म्हणजे मायेचं मंदिर, तिचे शब्द म्हणजे जीवनाचं मार्गदर्शन आणि तिचा सहवास म्हणजे आत्म्याला मिळणारी शांतता.

लहानपणी मी कोवळ्या पाखरासारखा होतो. जगाची ओळख नव्हती, परिस्थितीची समज नव्हती, भविष्याची दिशा नव्हती. पण त्या वेळी माझ्या पंखांना बळ देणारी, उडायला शिकवणारी आणि पडल्यावर पुन्हा उभं करणारी माझी आजी होती.

ती फक्त माझी आजी नव्हती, ती माझी सावली होती, माझं धैर्य होती, माझ्या आयुष्याची दिशा होती.

माझ्या आई–वडिलांनी मला जन्म दिला, पण माझं पालनपोषण, माझ्यावर झालेले संस्कार, माझ्या स्वभावाची जडणघडण – हे सगळं माझ्या आजीमुळे घडलं.

ती स्वतःच्या दुःखांना विसरून माझ्या आनंदासाठी जगली.

स्वतः उपाशी राहून मला घास भरवणारी, स्वतःच्या वेदना लपवून माझ्या चेहऱ्यावर हास्य आणणारी माझी आजी खऱ्या अर्थाने माझी कर्ती–धर्ती होती.

आमच्या घरची परिस्थिती साधी होती. अनेक अडचणी, संघर्ष आणि संकटं होती; पण आजीने कधीही परिस्थितीसमोर हार मानली नाही.

तिने मला शिकवलं –

गरिबी ही कमकुवतपणा नसते; मेहनत न करणं हा खरा कमकुवतपणा असतो.

तिच्या या शिकवणीमुळे माझ्या मनात जिद्द निर्माण झाली.

कठीण परिस्थितीतही डोकं उंचठेवून जगायचं बळ मला तिच्याकडून मिळालं.

रात्री झोपताना ती सांगणाऱ्या गोष्टी आजही कानात घुमतात.

रामायण, महाभारत, छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रम, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या कथा – या सगळ्या गोष्टींतून तिने मला जीवनाचा अर्थ शिकवला.

ती नेहमी म्हणायची –

माणूस मोठा पैशाने नाही होत, तर संस्कारांनी आणि प्रामाणिकपणाने होतो.

हे शब्द आजही माझ्या आयुष्याचं ब्रीद आहेत.

माझं मन जेव्हा अस्थिर व्हायचं,जीवनात संकटं यायची, तेव्हा तिच्या सहवासात मला शांतता मिळायची.

तिचा हात डोक्यावर पडला की जणू सर्व चिंता दूर व्हायच्या.

तिचा आवाज म्हणजे माझ्यासाठी आत्मविश्वास होता.

मी आयुष्यात यशस्वी झालो, नोकरीत स्थिरावलो, भारतीय सैन्यात भरती झालो आणि आज १३ वर्षांची सेवा पूर्ण केली; पण या यशामागे जर कोणाचा सिंहाचा वाटा असेल, तर तो माझ्या आजीचा आहे.

कारण तिने मला फक्त वाढवलं नाही, तर संकटांशी लढायला शिकवलं.

जेव्हा मी सैन्यात भरती होण्यासाठी तयारी करत होतो, तेव्हा अनेक अडचणी आल्या. शारीरिक मेहनत, मानसिक ताण, अपयशाची भीती – या सगळ्यांमध्ये आजीचा विश्वास माझ्यासाठी सर्वात मोठी ताकद होता.

ती म्हणायची –

तू सैनिक होणार, कारण तुझ्यात हार मानायची वृत्तीच नाही.

तिच्या या शब्दांनी माझ्यात आत्मविश्वास निर्माण केला.

आज मी देशाची सेवा करताना माझ्या गणवेशात मला तिचे आशीर्वाद जाणवतात.

ती वेळोवेळी मला आदर दिला, प्रोत्साहन दिलं आणि प्रत्येक कठीण प्रसंगी माझा आधार बनली.

मी हरलो तेव्हा ती म्हणायची –

हार मानणं तुझ्या रक्तात नाही.

हे शब्द माझ्या आयुष्याची ताकद बनले.

आज मी मागे वळून पाहतो,तेव्हा तिचे कष्ट डोळ्यासमोर उभे राहतात.

तिच्या हातावरील घट्टे, चेहऱ्यावरील सुरकुत्या आणि डोळ्यांतील अपार माया – हे सगळं माझ्यासाठी देवाचं रूप होतं.

तिने कितीतरी वेदना सहन केल्या, कितीतरी घाव पचवले; पण मला कधी त्याची जाणीव होऊ दिली नाही.

आजीचं प्रेम हे समुद्रासारखं विशाल असतं.

ती स्वतः दुःखात असली तरी आपल्या लेकरांना आनंदात ठेवण्यासाठी आयुष्यभर झटत राहते.

आजच्या आधुनिक युगात वृद्ध आई–वडिलांना आणि आजी–आजोबांना वृद्धाश्रमात पाठवण्याची वेळ येते, ही खूप वेदनादायक गोष्ट आहे.

कारण ज्यांनी आपल्यासाठी आयुष्य खर्च केलं, त्यांच्यासाठी दोन प्रेमाचे शब्द बोलणं ही आपली जबाबदारी आहे.

मी अनेकदा तिच्यावर प्रेम व्यक्त केलं नाही.

कधी तिच्यासमोर बसून तू माझं सर्वस्व आहेस असं सांगितलं नाही.

पण आज तिच्या जाण्यानंतर प्रत्येक क्षणी जाणवतं – माझ्या यशाचं खरं कारण तीच होती.

आज ती माझ्यात नाही, पण तिचे संस्कार माझ्या श्वासात आहेत.

तिचं प्रेम माझ्या आठवणीत जिवंत आहे.

तिच्या जाण्याने आयुष्यात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

घर तसंच आहे, माणसं तशीच आहेत; पण तिच्याशिवाय सगळं रिकामं वाटतं.

आजही मी गावाकडे गेलो की तिची आठवण प्रत्येक कोपऱ्यात जाणवते.

घरासमोरचा ओटा, चुलीपाशी बसलेली तिची प्रतिमा, सकाळी केलेली हाक, आणि माझ्यासाठी ठेवलेला गरम रोटीचा तुकडा – हे सगळं आजही मनाला रडवतं.

आजी म्हणजे फक्त नातं नसतं;

आजी म्हणजे निःस्वार्थ प्रेम, त्याग, माया आणि आशीर्वादाचं दुसरं नाव असतं.

आजही मला वाटतं, ती कुठेतरी स्वर्गातून माझ्याकडे पाहत असेल.

मी जेव्हा गणवेश घालतो, तेव्हा तिच्या डोळ्यांतील अभिमान आठवतो.

माझ्या प्रत्येक यशात तिचा आशीर्वाद आहे आणि माझ्या प्रत्येक श्वासात तिचं प्रेम आहे.

देवाने मला आयुष्यात अनेक माणसं दिली, पण माझी आजी हा देवाने दिलेला सर्वात सुंदर आशीर्वाद होता.

आज ती या जगात नसली तरी तिच्या आठवणी माझ्या हृदयात सदैव जिवंत राहतील.

तिचं प्रेम कधीच संपणार नाही.

माझ्या आयुष्याचा प्रत्येक शिखर, प्रत्येक सन्मान आणि प्रत्येक यश मी माझ्या आजीच्या चरणी अर्पण करतो.

कारण –

आईने मला जन्म दिला, पण माझ्या आजीने मला माणूस बनवलं.

आणि म्हणूनच

*माझ्या आयुष्यातील सर्वात मोठं स्थान जर कोणाचं असेल, तर ते माझ्या आजीचं आहे.*

स्वर्गीय शिवैक्य– गिरजाबाई देवराव आप्पा चपटे यांना भावपूर्ण श्रद्धांजली ₹:

शोकाकुल

**तुझाच नातु –**
**नागनाथ शिवलिंग चपटे (आर्मी)**
**रा.शेवडी (बा)**
**ता.लोहा .जि.नादेड.**

# संग्रहालय : स्मृती, संस्कृती आणि भविष्याचा जिवंत सेतू

इतिहास केवळ पुस्तकांच्या पानांत राहत नाही; तो वस्तूंमध्ये, अवशेषांत, शिल्पांत, चित्रांत, हस्तलिखितांत आणि विस्मृतीच्या उंबरठ्यावर उभ्या असंख्य स्मृतींमध्ये जिवंत असतो. एखाद्या राष्ट्राची ओळख त्याच्या वर्तमानाच्या झगमगाटाने जितकी ठरते, तितकीच ती त्याने आपल्या भूतकाळाशी राखलेल्या नात्यानेही ठरते. म्हणूनच संग्रहालय हे केवळ जुन्या वस्तू ठेवण्याचे दालन नाही; ते एका समाजाच्या स्मृतींचे घर असते. १८ मे रोजी साजरा होणारा जागतिक संग्रहालय दिन हा केवळ औपचारिक दिन नसून आपल्या सांस्कृतिक वारशाकडे नव्याने पाहण्याची संधी आहे. आजचा काळ वेगाचा आहे माहितीचा, तंत्रज्ञानाचा, बदलाचा आणि विस्मृतीचाही. रोज नवे घडते आणि कालचे सहज मागे पडते. या धावत्या जगात संग्रहालये आपल्याला थांबायला शिकवतात. ती सांगतात की भविष्य घडवायचे असेल, तर भूतकाळ समजून घ्यावा लागतो. कारण इतिहास हा केवळ कालक्रम नसतो; तो समाजाच्या आत्म्याचा आरसा असतो.

संग्रहालयात ठेवलेली प्रत्येक वस्तू निःशब्द असते; पण ती बोलत असते. एखादी मातीची मूर्ती, तांब्याचे भांडे, प्राचीन शस्त्र, जुन्या नाण्यांचा संच, एखाद्या राजाचा शिलालेख, एखाद्या क्रांतिकारकाचे पत्र किंवा एखाद्या संताचे हस्तलिखित या साऱ्या वस्तू काळाच्या पलीकडचा संवाद साधत असतात. त्या आपल्याला सांगतात की आपण कुठून आलो, कसे घडलो आणि आपल्या संस्कृतीने कोणते मूल्य जपले. दुर्दैवाने आपल्या समाजात संग्रहालयांकडे पाहण्याची दृष्टी अजूनही मर्यादित आहे. अनेकांसाठी संग्रहालय म्हणजे शाळेच्या सहलीत एकदा पाहायचे ठिकाण किंवा पर्यटनाच्या यादीतील एक औपचारिक टप्पा. पण प्रत्यक्षात संग्रहालय हे शिक्षणाचे, संवेदनशीलतेचे आणि नागरिकत्वाचे महत्त्वाचे विद्यापीठ आहे. तिथे इतिहास पाठ करून कळत नाही तर तो अनुभवून समजतो.

आज आपण डिजिटल युगात जगत आहोत. मोबाईलच्या स्क्रीनवर जग मावले आहे. माहिती एका क्लिकवर मिळते. पण माहिती आणि जाण यांत फरक असतो. इंटरनेट माहिती देते, संग्रहालय संदर्भ देते. स्क्रीनवर एखाद्या वस्तूचा फोटो दिसतो, पण संग्रहालयात त्या वस्तूची वेळ, संदर्भ, उपयोग आणि मानवी कथा दिसते. म्हणूनच संग्रहालये आज अप्रासंगिक नाहीत, उलट अधिक आवश्यक झाली आहेत. भारतीय संस्कृतीचा विचार केला, तर भारत देश जणू अनेक थरांनी घडलेली सभ्यता आहे. सिंधू संस्कृतीपासून ते आधुनिक स्वातंत्र्यलढ्यापर्यंतचा इतिहास येथे एकमेकांत गुंफलेला आहे. विविध भाषा, धर्म, पंथ, कला, स्थापत्य, लोकपरंपरा आणि सामाजिक चळवळी यांचा विलक्षण संगम येथे आढळतो. या विविधतेचे साक्षीदार म्हणजे आपली संग्रहालये. ती केवळ राजे–महाराजांचा इतिहास जपत नाहीत; ती सामान्य माणसाचेही जगणे नोंदवतात. मात्र, एक कठोर वास्तव स्वीकारावे लागेल. आपल्या अनेक संग्रहालयांची अवस्था समाधानकारक नाही. काही ठिकाणी धुळीने माखलेले अवशेष, अपुरी माहितीफलक, कालबाह्य मांडणी, तुटपुंज्या सुविधा आणि लोकांपर्यंत पोहोचण्यातली कमतरता दिसून येते. वारसा जपण्याची जबाबदारी केवळ सरकारची नाही; ती समाजाचीही आहे. शासन, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिक या सर्वांनी मिळूनच ही जबाबदारी उचलली पाहिजे.

आजच्या पिढीला इतिहासाशी जोडण्याचे आव्हान अधिक मोठे आहे. मुलांना भूतकाळ शिकवायचा असेल, तर तो जिवंतपणे दाखवावा लागेल. संग्रहालये ही त्यासाठी प्रभावी माध्यमे ठरू शकतात. शाळांमध्ये पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन संग्रहालयभेटीला शैक्षणिक प्रक्रियेचा भाग बनवले पाहिजे. कारण जे डोळ्यांनी पाहिले जाते, ते मनात अधिक काळ टिकते. संग्रहालयांचे महत्त्व केवळ सांस्कृतिक नाही तर ते सामाजिक आणि लोकशाहीदृष्ट्याही महत्त्वाचे आहे. इतिहासावर ज्याचा ताबा, भविष्याची दिशा अनेकदा त्याच्याकडे जाते. म्हणूनच वस्तुनिष्ठ, समावेशक आणि चिकित्सक इतिहासाची जपणूक अत्यावश्यक आहे. संग्रहालये समाजाला स्मरण करून देतात की इतिहास एकाच आवाजाचा नसतो; त्यात अनेक अनुभव, अनेक वेदना, अनेक विजय आणि अनेक संघर्ष सामावलेले असतात. विशेषतः आजच्या काळात, जेव्हा ओळखींच्या राजकारणातून इतिहासाचे अनेक अर्थ लावले जातात, तेव्हा संग्रहालयांची जबाबदारी अधिक वाढते. ती केवळ प्रदर्शनस्थळे नसून संवादाची जागा असली पाहिजेत. तिथे अभिमान असावा,



पण अंधगौरव नसावा तर चिकित्सकता असावी, पण तुच्छताही नसावी. इतिहासाशी प्रामाणिक राहणे हीच संग्रहालयांची खरी प्रतिष्ठा आहे. नागपूर सारख्या शहरांमध्ये स्थानिक इतिहास, सामाजिक चळवळी, साहित्यिक वारसा, औद्योगिक परिवर्तन आणि लोकसंस्कृती यांचे दस्तऐवजीकरण अधिक व्यापकपणे व्हायला हवे. प्रत्येक प्रदेशाची स्वतःची स्मृती असते. त्या स्मृती हरवल्या, तर फक्त वस्तू हरवत नाहीत तर एक सामूहिक ओळख हरवते.

आज जगभर संग्रहालयांची संकल्पना बदलत आहे. ती केवळ वस्तूंचे दालन राहिलेली नाहीत. संवादात्मक प्रदर्शन, डिजिटल पुनर्निर्मिती, ध्वनी–दृश्य सादरीकरण, मुलांसाठी अनुभवात्मक शिक्षण आणि समुदायाचा सहभाग या माध्यमांतून संग्रहालये अधिक जिवंत होत आहेत. आपणही ही दिशा स्वीकारली पाहिजे. वारसा जपणे म्हणजे केवळ कुलूप लावणे नव्हे तर तो लोकांपर्यंत अर्थपूर्ण पद्धतीने पोहोचवणे होय. संग्रहालये अर्थव्यवस्थेशीही जोडलेली आहेत. सांस्कृतिक पर्यटन, स्थानिक रोजगार, हस्तकला, मार्गदर्शक सेवा, संशोधन आणि प्रकाशन अशा अनेक क्षेत्रांना संग्रहालये चालना देऊ शकतात. पण त्यासाठी संग्रहालयांकडे 'खर्च' म्हणून नव्हे, तर 'गुंतवणूक' म्हणून पाहावे लागेल. एक आणखी महत्त्वाचा मुद्दा म्हणजे लोकसंग्रहालयांचा. मोठ्या राष्ट्रीय संग्रहालयांइतकेच स्थानिक आणि लोकस्मृती जपणारी लहान संग्रहालयेही महत्त्वाची आहेत. एखाद्या गावातील जुनी शेतीची अवजारे, लोककलेचे नमुने, पारंपरिक वेशभूषा, ग्रामजीवनातील वस्तू हेही तितकेच मौल्यवान वारसासामान आहे. इतिहास फक्त राजवाड्यांत घडत नाही; तो चुलीपाशी, शेतात, बाजारात आणि लोकगीतांतही घडतो.आजचा माणूस आधुनिकतेच्या मोहात अनेकदा मुळांपासून दूर जात आहे. प्रगती आवश्यक आहे; पण मुळे विसरून केलेली प्रगती अनेकदा रिकामी ठरते. संग्रहालये आपल्याला सांगतात बदल स्वीकारा, पण स्मृती हरवू देऊ नका. कारण ज्यांना आपला भूतकाळ ठाऊक नसतो, त्यांचे भविष्य अनेकदा उथळ ठरते. जागतिक संग्रहालय दिन हा केवळ शुभेच्छांचा दिवस नसावा; तो आत्मपरीक्षणाचा दिवस असावा. आपण आपल्या वारशाशी किती जोडलेले आहोत? मुलांना आपण इतिहासाशी कसे परिचित करून देतो? आपल्या शहरातील, गावातील स्मृती आपण जपतो का? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची ही वेळ आहे. आज गरज आहे ती संग्रहालयांना जिवंत करण्याची. तिथे फक्त वस्तू नसाव्यात; कथा असाव्यात. फक्त अवशेष नसावेत; संवाद असावा. फक्त स्मृती नसाव्यात; प्रेरणा असावी. कारण संग्रहालये भूतकाळाची समाधी नसतात; ती भविष्याच्या जाणिवेची पाळेमुळे असतात. ती आपल्याला शिकवतात की काळ पुढे जातो, पण मूल्ये टिकवावी लागतात. संस्कृती जपावी लागते. स्मृतींचे रक्षण करावे लागते. जागतिक संग्रहालय दिनाच्या निमित्ताने आपण हा संकल्प करू या, आपल्या इतिहासाचा अभिमान बाळगू, पण तो समजून घेऊन आपल्या वारशाचे जतन करू, पण तो लोकांपर्यंत पोहोचवून आणि आपल्या पुढच्या पिढ्यांना फक्त माहिती नव्हे, तर स्मृतींची जाण देऊ. कारण शेवटी, संग्रहालयातील एखादी शांत वस्तू कधीकधी संपूर्ण पिढीला विचार करायला भाग पाडते आणि तेव्हाच कळते भूतकाळ जपणे म्हणजे मागे जाणे नव्हे तर पुढे जाण्यासाठी स्वतःला ओळखणे होय.

**–प्रविण बागडे,नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाच्या निवडणुकीत ॲड.यदुपत अर्धापूरकर यांचा तब्बल २९६ मताधिक्याने अध्यक्षपदी विजय

## अधिवक्ता एकता पॅनलने प्रचंड बहुमताने ऐतिहासिक विजयाने मारली बाजी

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्हा अधिवक्ता संघटनेच्या २०२६-२८ च्या कार्यकारिणीच्या निवडणुकीत अत्यंत चुरशीच्या लढतीनंतर अखेर निकाल जाहीर झाला असून अध्यक्षपदी ॲड. यदुपत श्यामसुंदरराव देशमुख अर्धापूरकर यांनी दणदणीत विजय मिळवला.एकूण १७८२ मतांपैकी अर्धापूरकर यांना ९५७ मते मिळाली, तर शैलेश देशमुख यांना ६६१ आणि जगजीवन भेदे यांना १४६ मते मिळाली.अध्यक्ष पदामध्ये ॲड. यदुपत अर्धापूरकर हे तब्बल २९६ च्या मताधिक्याने विजयी होवून त्यांनी नांदेड अधिवक्ता संघाच्या निवडणुकीत नवा इतिहास घडवला आहे.उपाध्यक्ष पदासाठी झालेल्या लढतीत ॲड.संगमेश्वर देलमडे यांनी ७२८ मते मिळवत विजय संपादन करून त्यांच्या विरोधातॲड.महिंद वावळे यांना ५१९ तर ॲड.निरज भोसीकर यांना ४५६ मते मिळाली. महिला उपाध्यक्ष पदावर ॲड. दीपाली डोंनगांवकर यांनी ७५९ मतांसह विजय मिळवला तर ॲड. विजयमाला मनवर यांना ६१५ व ॲड.ज्योती सूर्यवंशी यांना ३५० मते मिळाली.सचिव पदासाठी ॲड.कपिल पाटील यांनी ७०९ मते मिळवत विजय मिळवला तर ॲड. ज्ञानेश्वर देशमुख यांना ३९५,ॲड. रविंद्र पाटील यांना ३३० आणि ॲड.मंगेश वाघमारे यांना २९९ मते मिळाली.सहसचिव पदावर ॲड. जगदीश हाके यांनी ६६४ मतांसह विजय संपादन केला तर ॲड. जावेद पठाण यांना ४६८ ॲड. चंद्रमुनी सोनसळे यांना ३२४ व ॲड.तहूर पठाण यांना २५७ मते मिळाली.महिला सहसचिव पदावर ॲड.सुजाता बगाटे यांनी ७७८ मते मिळवत विजय मिळवला तर ॲड.वृशाली जोशी यांना ३५८, ॲड.वनिता बोईनवाड यांना ३३२ व ॲड.नगमा सिद्दीकी यांना २४५ मते मिळाली.कोषाध्यक्ष पदावर ॲड. मंगेश जामनिक यांनी ६९८ मते मिळवत विजय मिळवला तर ॲड. फेरोज पठाण यांना ४७५,ॲड. विष्णू पाटील यांना ३९३ व ॲड. शिवकांत किरवले यांना १४७ मते मिळाली.विशेष सहाय्यक पदासाठी ॲड.प्रदीप राठोड यांनी ५७३ मते मिळवत विजय मिळवला तर ॲड. जयेश पाटील यांना ५४३,ॲड. गौतम किन्नीकर यांना ४१० व ॲड. गणेश जाधव यांना १८३ मते मिळाली.सदस्य पदी विजयी झालेले उमेदवार ॲड.पवार मुक्ताई नारायणराव ९१२ मते,ॲड.गावंडे बाबू धर्माजी ८३८ मते,ॲड. मठवाले रामसिंघ पुरणसिंघ ७९२ मते,ॲड.पुंडगे रिना सतीश ७९२ मते,ॲड.हटकर प्रिती ७६३ मते,

ॲड. बोकारे कार्तिक नितीनराव ७१९ मते,ॲड. येरेकर सुमेध बळीराम ७१९ मते,ॲड. बडो उषा सुरेशराव ७१२ मते,ॲड.हटकर सटवाजी व्यंकटराव ६७९ मते,ॲड. सोलगे (पाटील) गंगासागर ६७३ मते

ॲड.राठोड संकेत दिलीपराव ६६० मते अशी असून निवडणुकीची मतमोजणी तब्बल ७२ फेऱ्यांनंतर पूर्ण झाली व निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी फटाके,ढोल,ताशांचा जल्लोष करत अभिनंदनाचा वर्षाव केला.नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाच्या निवडणुकीत ॲड.यदुपत अर्धापूरकर यांचा तब्बल २९६ मताधिक्याने अध्यक्षपदी विजय झाल्याने वकिल संघाच्या निवडणूकीत हा एक ऐतिहासिक रेकॉर्ड ब्रेक झाला असून अधिवक्ता एकता पॅनलने प्रचंड बहुमताने ऐतिहासिक विजयाची बाजी मारली असून या संपूर्ण पॅनलचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून पुढील नाविन्यपूर्ण उपक्रम व कार्यास खूप खूप शुभेच्छा देण्यात आल्या.



# अभिनव संस्कार शिबिराला हिंगणघाटात भव्य सुरुवात; १९० शिबिरार्थी सहभागी

## रोज एक तास योगा, व्यायामाला पर्याय नाही-डॉ.नयना तुळसकर

दैनिक वादळ वार्ता
**हिंगणघाट । प्रतिनिधी**

येथे अभिनव विचार मंच द्वारे १६ मे पासून मातोश्री आशाताई कुणावार महाविद्यालय, तुळसकर लॉन येथे अभिनव संस्कार शिबिर ला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली.हिंगणघाट नगरपालिकेच्या नगराध्यक्षा डॉ. नयनाताई तुळसकर यांच्या हस्ते या पाच दिवसीय शिबिराचे उद्घाटन झाले. याप्रसंगी व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्त्या सारिका निलेश ठोंबरे, कमल भांडे, योग शिक्षिका विद्या पेडंके, प्राची पाचखेडे, रेणुदास नागतोडे, शीतल राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.






उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. नयनाताई तुळसकर म्हणाल्या, आज जीवनशैली वारंवार बदलत आहे, त्यामुळे आजारांचे प्रमाण वाढत आहे. आपल्या रोजच्या जीवनात किमान एक तास योगा, व्यायाम व योग्य आहार याला पर्याय नाही. आयुष्य सुंदर व्हावं यासाठी आपण शिक्षण घेतो, पण शिक्षण घेताना शरीराकडे दुर्लक्ष करतो, ताण देतो. या ताण-तणावातून बाहेर काढण्यासाठी हे शिबिर नक्कीच मदत करेल, याचा मला विश्वास आहे.

याप्रसंगी सारिका निलेश ठोंबरे म्हणाल्या की, या अभिनव संस्कार शिबिरातून तणावमुक्तीचा मंत्र तुम्हाला मिळणार आहे. शारीरिक व मानसिक विकासासोबतच संस्कारक्षम पिढी घडवणे हा शिबिराचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन सुकळकर यांनी केले. या शिबिरात एकूण १९० शिबिरार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे. पाच दिवस चालणाऱ्या या शिबिराला पालक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

या शिबिरात योग, प्राणायाम, खेळ, संगीत, लाठीकाठी, हस्तकला, चित्रकला, लेखन कला इत्यादी विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे.

# 'स्व-गणना' मोहिमेत सेवादासनगर अव्वल जिल्ह्यातील पहिले 'शंभर टक्के' गाव

## २१० कुटुंबांची शंभर टक्के नोंदणी; ग्रामस्थांच्या सहभागातून उभा राहिला आदर्श



दैनिक वादळ वार्ता
**जिवती । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या जनगणना प्रक्रियेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ऑनलाइन 'स्व-गणना' मोहिमेला जिवती तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून मौजा सेवादासनगर येथील २१० कुटुंबांची शंभर टक्के स्व-गणना पूर्ण झाली आहे. त्यामुळे सेवादासनगर हे चंद्रपूर जिल्ह्यात स्व-गणना पूर्ण करणारे पहिले गाव ठरले आहे.

जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील घरगणना १६ मे ते १४ जूनदरम्यान होणार असली, तरी त्यापूर्वी १ ते १५ मे या कालावधीत नागरिकांनी se.census.gov.in या संकेतस्थळावर मोबाईल क्रमांकाद्वारे नोंदणी करून माहिती भरावी, असे आवाहन तहसीलदार रूपाली मोगरकर यांनी केले होते. फॉर्म सबमिट केल्यानंतर मिळणारा १६ अंकी आयडी जतन करून तो प्रगणकास दाखविण्याच्या सूचनाही प्रशासनाकडून देण्यात आल्या होत्या.या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामपंचायत स्तरावर विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात आली. राजुरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत नोकेवाडाच्या महिला सरपंच विमलताई किसन राठोड यांनी गावातील कुटुंबप्रमुखांशी थेट संपर्क साधून स्व-गणनेचे महत्त्व पटवून दिले. नागरिकांना वेळोवेळी मार्गदर्शन करून ऑनलाइन नोंदणी व माहिती भरण्यास प्रोत्साहित करण्यात आले.या मोहिमेत गावातील युवक, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच नागरिकांनी सक्रिय सहभाग घेतला. ग्रामस्थांच्या एकजुटीमुळे सेवादासनगरमध्ये स्व-गणना प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली असून तालुक्यातील इतर गावांसमोर आदर्श निर्माण झाला आहे. गावात जनगणनेबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# शासकीय वाहनांचे निर्लेखनकरीता अर्ज आमंत्रित

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडील मारुती स्वीफ्ट डिझायर (क्र. एम.एच. - १२, ए.एच. ९१३१) या शासकीय वाहन निर्लेखन करून लिलावद्वारे विक्री करावयाचे आहे. त्यासाठी इच्छुक नोंदणीकृत व्यक्ती/ संस्था/डीलर यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर वाहन सद्यस्थिती नादुरुस्त असून २०१२ चे मॉडल आहे.

अटी व शर्ती : लिलाव अर्ज नि:शुल्क असून कार्यालयातून प्राप्त करावा. अर्जासोबत बयाणा रक्कम २ हजार रुपये, सह जिल्हा निबंधक वर्ग १ चंद्रपूर यांच्या नावाने डिमांड ड्राफ्ट स्वरुपात जोडणे अनिवार्य आहे. बयाणा रक्कम विना परतावा राहील. रोखीने रक्कम स्विकारली जाणार नाही. वाहनाची पाहणी सुट्टीचे दिवस वगळून १२ मे ते २२ मे या कालावधीत कार्यालयीन वेळेत करता येईल. लिलाव अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २५ मे २०२६ आहे. प्राप्त अर्ज २७ मे रोजी सकाळी ११ वाजता उघडण्यात येईल. लावण्यात येणारी बोली ही रक्कम ५ हजार किंवा त्याच्या पटीत असेल

निविदा सादर करण्याचा पता : सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, हॉल क. ४, पहिला मजला, चंद्रपूर. ई-मेल- jdrchandrapurgmail.com

अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत वरील पत्त्यावर संपर्क साधावा, असे मुद्रांक जिल्हाधिकारी प्रदीप पाटील यांनी कळविले आहे.



# आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चंद्रपूर जिल्ह्यातील वाहतूक समस्यांवर ठोस उपाययोजनांना गती

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील वाढती वाहतूक कोंडी, अपघातांची गंभीर समस्या आणि वाहतूक पोलिसांवरील वाढता ताण लक्षात घेता राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेत राज्याचे पोलीस महानिरीक्षक मनोज कुमार शर्मा यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. जिल्ह्यातील वाहतूक समस्यांवर ठोस उपाययोजनांना गती मिळावी, यासाठी ट्रॅफिक व्यवस्थापनासाठी किमान १०० होमगार्डची नियुक्ती करण्यात यावी, अशी महत्त्वपूर्ण मागणी त्यांनी केली. यामध्ये ७५ पुरुष आणि २५ महिला होमगार्डचा समावेश असावा, असेही आ.मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले. या चर्चेनंतर पोलीस महानिरीक्षकांनी सकारात्मक प्रतिसाद देत आठवडाभरात आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन दिले असून चंद्रपूरच्या वाहतूक समस्यांवर प्रभावी निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.चर्चेदरम्यान आ. सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्थेवरील वाढता ताण, अपुरे मनुष्यबळ, अवजड वाहनांची वाढती संख्या आणि सातत्याने घडणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर गंभीर चिंता व्यक्त केली. वाढत्या परिस्थितीचा आढावा घेत तातडीच्या आणि प्रभावी उपाययोजनांची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. वाढत्या वाहनसंख्येमुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी, मुख्य मार्गांवरील वाढलेला ताण आणि त्यामुळे नागरिकांना दररोज सहन करावा लागणारा मनस्ताप हाही मुद्दा ठामपणे मांडला.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील वाहतूक समस्यांबाबत सातत्याने विधानसभेत प्रभावीपणे आवाज उठवला आहे. विशेषतः चंद्रपूर शहरासाठी रिंग रोडची वाढती गरज, ट्रॅफिक जॅममुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी तसेच ड्रंक अँड ड्राईव्हच्या वाढत्या घटनांमुळे होणारे अपघात याकडे त्यांनी वारंवार शासनाचे लक्ष वेधले आहे.

ड्रंक अँड ड्राईव्हविरोधात मोठ्या प्रमाणावर मोहीम राबवून कठोर कारवाई करण्याची गरजही आ.मुनगंटीवार यांनी यापूर्वी अधोरेखित केली आहे.वाहतूक पोलिसांवरील वाढता ताण लक्षात घेता ट्रॅफिक



व्यवस्थापनासाठी स्वतंत्र मनुष्यबळाची आवश्यकता असल्याचे आ.मुनगंटीवार यांनी चर्चेत स्पष्ट केले. जिल्ह्यातील मुख्य चौक, महामार्ग आणि वाहतूक कोंडीच्या ठिकाणी पोलिसांसोबत होम गार्ड तैनात करण्याचाही प्रस्ताव त्यांनी मांडला.चंद्रपूर जिल्हा औद्योगिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा जिल्हा मानला जातो. जिल्ह्यात कोळसा खाणी, सिमेंट उद्योग, पेपर मिल, वीज निर्मिती केंद्रे तसेच जागतिक स्तरावर प्रसिद्ध ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ असते.

प्राप्त आकडेवारीनुसार, चंद्रपूर शहरातून दररोज सुमारे ६ हजार ते ६ हजार ५०० वाहनांची ये-जा होते.जिल्ह्यात सध्या एकूण ८ लाख ४१ हजार ४७६ वाहने नोंदणीकृत असूनत्यात ६ लाख ६९ हजारांहून अधिक दुचाकी, ७९ हजारांहून अधिक चारचाकी आणि जवळपास ९० हजार अवजड वाहनांचा समावेश आहे. याशिवाय बाहेर जिल्ह्यातून आणि राज्यातून येणाऱ्या वाहनांची संख्याही मोठी आहे.जिल्ह्यातून ७ राष्ट्रीय महामार्ग आणि १३ राज्य महामार्ग जात असल्याने वाहतूक नियंत्रणाचे आव्हान अधिक गंभीर बनले आहे. चंद्रपूर शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९३० हा २४ तास वाहतुकीने गजबजलेला असतो. शहरातील किमान १२ ठिकाणी कायमस्वरूपी वाहतूक कोंडी निर्माण होत असून ग्रामीण भागातील १४ तालुक्यांतील २० हून अधिक ठिकाणी वाहतूक समस्येची स्थिती गंभीर आहे.अपघातांच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास सन २०२३ मध्ये ७९२, सन २०२४ मध्ये ७८५ तर सन २०२५ मध्ये आतापर्यंत ७५३ अपघातांची नोंद झाली आहे. गंभीर अपघातांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. जिल्ह्यातील ३४ पोलीस ठाण्यांपैकी तब्बल १५ ठाण्यांच्या कार्यक्षेत्रातून राष्ट्रीय महामार्ग जात असल्याने वाहतूक नियंत्रणाचे आव्हान अधिक जटिल बनले आहे. परिणामी उपलब्ध मनुष्यबळावर मोठा ताण निर्माण झाला असून वाहतूक व्यवस्थापनासाठी स्वतंत्र आणि सक्षम ट्रॅफिक फोर्सची गरज अधिक तीव्रतेने जाणवत आहे.या सर्व पार्श्वभूमीवर आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पोलीस महानिरीक्षकांकडे ठोस आणि परिणामकारक उपाययोजनांची मागणी केली आहे. होमगार्डची नियुक्ती आणि ड्रंक अँड ड्राईव्हविरोधात विशेष मोहीम राबविणे तसेच आधुनिक ट्रॅफिक व्यवस्थापनाच्या उपाययोजना प्रभावीपणे अंमलात आणणे, या मागण्यांमुळे चंद्रपूर जिल्ह्यातील वाहतूक समस्यांवर दिलासा मिळेल आणि नागरिकांना सुरक्षित, सुलभ वाहतुकीचा लाभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# २० रुपयांच्या सीटसाठी जीव धोक्यात वाहतूक विभाग मात्र ‘झोपेत’!

## विमाननगर ते वाघोली मार्गावर सहा आसनी रिक्षांत दहा-दहा प्रवासी; नियमांचा रस्त्यावरच चुराडा

दैनिक वादळ वार्ता
**पुणे । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

स्मार्ट सिटीच्या गप्पा रंगत असताना विमाननगर ते वाघोली आयटी पार्क मार्गावर मात्र प्रवाशांचा जीव अक्षरशः ‘कोंबून’ नेला जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सहा आसनक्षमतेच्या रिक्षांत दहा ते बारा प्रवासी भरून वाहतूक केली जात असतानाही वाहतूक पोलीस आणि आरटीओकडून प्रभावी कारवाई होत नसल्याने चालक बिनधास्त झाले आहेत.

विमाननगर ते खराडी आयटी पार्क आणि विमाननगर ते वाघोली या मार्गांवर सकाळ-संध्याकाळ रिक्षांमध्ये प्रवासी अक्षरशः एकमेकांच्या अंगावर बसून प्रवास करत आहेत. आयटी कंपन्यांमध्ये काम करणारे कर्मचारी, महिला, विद्यार्थी यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. मात्र प्रशासनाचे लक्ष केवळ कागदी मोहिमांपुरतेच मर्यादित असल्याची टीका नागरिकांतून होत आहे.

विशेष म्हणजे, कारवाई सुरू आहे असा दावा करणाऱ्या वाहतूक विभागाच्या नाकावर टिच्चून ही ओव्हरलोडिंगची वाहतूक सुरू आहे. रस्त्यावर उघडपणे नियमांचे उल्लंघन होत असताना संबंधित यंत्रणांना ते दिसत नाही का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

वाहतूक पोलिसांकडून नियमित कारवाईचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात रिक्षाचालकांमध्ये कारवाईची भीतीच उरलेली नसल्याचे दिसते. नो-पार्किंग, ओव्हरलोडिंग आणि वाहतूक कोंडी यामुळे प्रवाशांचा त्रास वाढत असताना अधिकारी मात्र विशेष मोहीम राबवू या पारंपरिक उत्तरावरच समाधान मानत आहेत.

दरम्यान, आरटीओकडून तक्रारीसाठी देण्यात आलेला ८२७५३३०१०१ हा व्हॉट्सअॅप क्रमांकही केवळ दिखावा असल्याचा आरोप होत आहे. अतिरिक्त प्रवासी घेणाऱ्या रिक्षांविरोधातील तक्रारींना प्रतिसादच मिळत नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. तक्रार ‘सीन’देखील होत नसल्याने तक्रार करा हा सल्ला फक्त औपचारिकता ठरत असल्याची चर्चा आहे.

याबाबत एका रिक्षाचालकाने दिलेले उत्तर तर प्रशासनाच्या अपयशावर शिक्कामोर्तब करणारे ठरत आहे. २० रुपयांत सीट हवी असेल तर अॅडजस्टमेंट करावी लागेल; आरामदायी प्रवास हवा असेल तर खासगी रिक्षा करा, असे उघडपणे सांगण्याइतका चालकांचा आत्मविश्वास वाढला आहे. यावरून कारवाईचा धाक किती उरला आहे, हे स्पष्ट होत आहे.

दररोज हजारो प्रवासी जीव धोक्यात घालून प्रवास करत असताना प्रशासन एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे का, असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



# झोपडपट्टी हक्क संघर्ष समिती केजचे बेमुदत उपोषण तूर्त मागे

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



झोपडपट्टी हक्क संघर्ष समिती, केज च्या वतीने शुक्रवार दिनांक १५ मे २०२६ पासुन श्री. विठ्ठल मंदिर, सभामंडप, क्रांती नगर, कानडी रोड, केज येथे बेमुदत उपोषण मा. बाबुराव गालफाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली १५ मे सकाळी ०९:३० पासुन ते १६ मे २०२६ रात्री १०:३० पर्येत विठ्ठल नगर, कोकीस पीर, क्रांती नगर, कानडी रोड, परिसरातील मूलभूत नागरी समश्या सर्थात पाणी पुरवठा सुरुळीत करणे, बंद असलेले बोर दुरुस्त करणे, नवीन धनेगाव पाईप लाइन टाकून पाणी पुरवठा पाईप द्वारे चालू करून अंतर्गत रस्ते, नाल्या, पाईप लाईन करणे. ईत्यादी आश्वासन मा. प्रभारी तहसीलदार भंडारी साहेब तसेच मा. मुख्याधिकारी ढोपे साहेब यांनी दूरध्वनी द्वारे सविस्तर चर्चा करून मा राऊत साहेब, व रफिक खुरेशी नगर पंचायत केज, आणि मा. तहसील कार्यालय केज यांच्या प्रतिनिधी नी उपोषण कर्ते बाबुराव गालफाडे सर, गंपू मस्के, रशीद तांबोळी, पठाण मामू, प्रा.अजय गलफाडे सर, सय्यद शकील, इरफान तांबोळी, साहिल तांबोळी, बबन राव लांडगे, अशोकराव जाधव, लखन मस्के, इरफान पठाण, अनिल लोखंडे, अरविंद चालक, पांडुरंग कसबे, उमेश काकडे, प्रभू पवार, अर्जुन शिंदे यांच्या उपस्थित तूर्त उपोषण पंधरा दिवसा करीता मागे घेण्यात आले. प्रमुख अधिकारी, कर्मचारी यांनी सर्व उपोषण कर्ते यांना शरबत देऊन उपोषण स्तगीत करण्यात आले.

# अंगणवाडीतील बालकांना उष्णतेच्या तिव्रतेपासुन सुरक्षित ठेवण्यासाठी उन्हाळी सुट्टी द्या,लेक लाडकी अभियानाची मागणी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

राज्यात उष्णतेची तीव्र लाट सुरू असून बीड जिल्ह्यातही तापमानात मोठी वाढ होत आहे. अशा परिस्थितीत अंगणवाड्यांमध्ये येणाऱ्या तीन ते सहा वर्षे वयोगटातील बालकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.त्यामुळे अंगणवाड्यांना तातडीने उन्हाळी सुट्टी जाहीर करावी,अशी मागणी लेक लाडकी अभियान, महाराष्ट्र राज्य च्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात लेक लाडकी अभियानाचे मार्गदर्शक प्राचार्य डी.जी.तांदळे, लेक लाडकी अभियानाचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांची भेट घेऊन निवेदन दिले.निवेदनात म्हटले आहे की,वाढत्या उष्णतेमुळे अंगणवाड्यां मध्ये पुरेशा सुविधा नसल्याने बालकांना त्रास



सहन करावा लागतआहे. अनेक अंगणवाड्यांमध्ये वायुवीजन,पंखे तसेच शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अपुरी आहे. परिणामी उष्माघात, डिहायड्रेशन,थकवा, चक्कर येणे आदी आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.प्राथमिक व माध्यमिक शाळांना उन्हाळी सुट्टी जाहीर करण्यात आलेली असताना अंगणवाड्या सुरू असल्याने बालकांच्या उपस्थितीत ही घट होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.त्यामुळे बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अंगणवाड्यांना उन्हाळी सुट्टी देण्याचा निर्णय घ्यावा,अशी मागणी करण्यात आली.

दरम्यान,‘टेक होम रेशन ’च्या माध्यमातून बालकांना पोषण आहार उपलब्ध करून द्यावा, अशी सूचनाही निवेदनातून करण्यात आली.यावेळी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी निवेदनाची दखल घेत संबंधित विभागाशी चर्चा करून योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्याचे लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांनी सांगितले.

# पत्रकारांशी स्नेहसंबंध ठेवा; प्रसारमाध्यमे हेच संघटन बळकट करणारे प्रभावी माध्यम-राम कुलकर्णी

दैनिक वादळ वार्ता
**धाराशिव । प्रतिनिधी**

राजकारणात कार्य करत असताना पक्षाची भूमिका,नेतृत्वाने केलेली विकासकामे तसेच केंद्र व राज्य सरकारच्या जनहिताच्या योजना तळागाळातील सामान्य जनतेपर्यंत पोंहोचवायच्या असतील, तर प्रसारमाध्यमांची साथ अत्यंत महत्त्वाची ठरते.पत्रकारांशी स्नेह पूर्ण संबंध ठेवा,त्यांच्या सुखदुःखात सहभागी व्हा ; याच माध्यमातून आपले कार्य प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचू शकते,असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केले.ते भारतीय जनता पक्षाच्या पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियानांतर्गत धाराशिव जिल्ह्याचे प्रशिक्षण शिबिर उदगीर येथील शिवम रिसॉर्टमध्ये आयोजित करण्यात आले होते.यावेळी प्रसारमाध्यमांची भूमिका या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.राम कुलकर्णी म्हणाले पुढे की,वर्तमान काळ हा डिजिटल संवादाचा आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा काळ आहे. पारंपरिक माध्यमां सोबतच सोशल मीडिया, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करणे काळाची गरज बनली आहे. संघटनेचे विचार, सरकारची विकासकामे आणि जनहिताच्या योजना प्रभावी पद्धतीने जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात प्रसिद्धी विभाग सक्षम,तत्पर आणि कार्यक्षम असणे आवश्यक आहे.प्रेस नोट तयार करणे,सोशल मीडियासाठी आकर्षक पोस्ट व घोषवाक्ये बनवणे,व्हिडिओ स्क्रिप्ट, ग्राफिक्स,पोस्टरडिझाईन यामध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होऊ शकतो,असेही त्यांनी सांगितले.फेसबुक, इंस्टाग्राम,एक्स (ट्विटर), यूट्यूब आणि व्हॉट्सप यांसारखी माध्यमे आज राजकीय संवादाची प्रभावी साधने बनली असून त्यांचा सकारात्मक आणि जबाबदारीने वापर व्हावा,असे आवाहन त्यांनी केले.

सोशल मीडियावर पोस्ट करताना वैयक्तिक टीका टाळून केंद्र आणि राज्य सरकारच्या जनहिताच्या योजनांची माहिती, सकारात्मक विचार आणि स्थानिक प्रश्नांवरील भूमिका समाजापर्यंत पोहोचवणे महत्त्वाचे आहे,असेही कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.प्रिंट मीडियाचा आजही सामान्य जनते मध्ये मोठा विश्वास असून स्थानिक दैनिके, ऑनलाइन पोर्टल्स आणि पत्रकारांशी सातत्याने संपर्क ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.पत्रकार हे समाज आणि जनते मधील महत्त्वाचे दुवा आहेत.त्यांच्या कौटुंबिक सुखदुःखात सहभागी होणे,स्नेहसंबंध जपणे आणि सातत्याने संवाद ठेवणे यामुळेच संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेता येते,असेही ते म्हणाले.राजकारणात मोठे व्हायचे असेल,तर प्रसारमाध्यमांचा आधार हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.माध्यमां शिवाय प्रभावी राजकारण करणे शक्य नाही, असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना माध्यमांशी सकारात्मक नाते निर्माण करण्याचे आवाहन केले. या शिबीरात माजी आ. श्री.सुजितसिंह ठाकुर, जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी,वर्ग प्रमुख ड.श्री.अनिल काळे, नितिन काळे जिल्हा परिषद अध्यक्ष सौ. अर्चनाताई पाटील आदी मान्यवरांची उपस्थिती होती.



# भांदक प्रेस क्लबकडून गुणवंत विद्यार्थी अयान अजाणीचा गौरव

दैनिक वादळ वार्ता
**भद्रावती । प्रतिनिधी**



सीबीएसई बारावी परीक्षेत ९९.६० टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या पडोली येथील नारायणा विद्यालयाच्या विद्यार्थी अयान अब्बास अलीहुसेन अजाणी याचा भांदक प्रेस क्लबच्या वतीने सत्कार करण्यात आला. अयानच्या उल्लेखनीय यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्याचे अभिनंदन होत आहे.अयानने नियमित अभ्यास, वेळेचे योग्य व्यवस्थापन आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश मिळवल्याचे सांगितले. अभ्यासात सातत्य ठेवत प्रत्येक विषय समजून घेण्यावर भर दिल्यामुळे उत्कृष्ट निकाल साध्य झाल्याची भावना त्याने व्यक्त केली. विशेष म्हणजे, यापूर्वी दहावीच्या सीबीएसई परीक्षेतही अयानने ९८.८० टक्के गुण मिळवत चंद्रपूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला होता. त्यामुळे त्याच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. आपल्या यशाचे श्रेय अयानने आई-वडील, शिक्षक आणि शाळेच्या प्रोत्साहनपर वातावरणाला दिले. त्याच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी भांदक प्रेस क्लबचे अध्यक्ष सुधीर पारधी, डॉ. यशवंत घुमे, सुनील पतरंगे, ईश्वर शर्मा, वतन लोणे, फजल अली,हनुमान घोटेकर यांच्यासह अयानचे आई वडील उपस्थित होते. उपस्थितांनी अयानच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देत त्याच्या यशाचे कौतुक केले.

# नादरपूर येथे दुग्ध व्यवसाय विषयक एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**पिशोर । प्रतिनिधी**

कन्नड तालुक्यातील नादरपूर येथे आज दि. १६ मे २०२६ रोजी पशुपालक व दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी आधुनिक दुग्ध व्यवसाय विषयक एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सन्माननीय श्री रमेश नागोराव निकम यांनी भूषविले.



या कार्यशाळेस प्रमुख अतिथी म्हणून सन्माननीय डॉ. गजानन चव्हाण साहेब, जिल्हा प्रकल्प अधिकारी, विदर्भ-मराठवाडा दूध विकास प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर, सन्माननीय डॉ. नीळकंठवार साहेब, पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती छत्रपती संभाजीनगर तसेच सन्माननीय श्री आसिफ पठाण, पशुधन पर्यवेक्षक, छत्रपती संभाजीनगर उपस्थित होते.

कार्यशाळेमध्ये नादरपूर व जवखेडा बु. परिसरातील पशुपालक, दूध उत्पादक शेतकरी व ग्रामस्थांना आधुनिक पद्धतीने दुग्ध व्यवसाय कसा करावा याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी डॉ. गजानन चव्हाण यांनी जातिवंत गाईंचे संगोपन, त्यांची निगा, दुग्ध उत्पादन वाढविण्याच्या आधुनिक पद्धती तसेच पशुपालकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ कसा घ्यावा याविषयी माहिती दिली. तसेच उपस्थित शेतकऱ्यांच्या अडी-अडचणी जाणून घेत त्यांच्या प्रश्नांचे निरसनही करण्यात आले. या कार्यक्रमास गावातील व परिसरातील पशुपालक, दूध उत्पादक शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सरपंच लक्ष्मण बळी यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री दिलीप निकम साहेब, प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077